राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि.वि/४७१५

दिनांक:—१२—०६—२०२३.

सत्र २०२३—२४ करीता पदवी स्तरावरील अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील प्रवेशाकरीता नोंदणीबाबत.

## जाहिर सुचना

सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व प्राचार्यांना या सुचनेद्वारे सुचित करण्यांत येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा अंतर्गत संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात **सत्र २०२३—२४** करीता अव्यावसायिक महाविद्यालयातील पदवी (यु.जी.) स्तरावरील अभ्यासक्रमात प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरिता अर्ज सादर करण्यापूर्वी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या वेब पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने **दि. १५—०६—२०२३ ते दि. ०३—०७—२०२३** पर्यंत नोंदणी करुन सर्व कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत. त्यानंतर झालेल्या नोंदणीची प्रिंन्ट आऊट घेऊन ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या महाविद्यालयात प्रवेशासाठी **दि. १५—०६—२०२३ ते दि. ०५—०७—२०२३** पर्यंत महाविद्यालयाच्या प्रवेश अर्जासोबत नोंदणीची प्रत सादर करावयाची आहे. महाविद्यालयाने आपल्या स्तरावर विद्यापीठाने दिलेल्या एकरुप वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवून, मेरीट लिस्ट तयार करुन प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर नोंदणी करुन कागदपत्रे अपलोड केल्याची खातरजमा केल्याशिवाय महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेश निश्चित होण्यास पात्र ठरणार नाही करिता सर्व संबंधित विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांनी याची कृपया वेळीच नोंद घ्यावी तसेच कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी सदर महाविद्यालयास सत्र २०२३—२४ करिता विद्यापीठाचे संलग्नीकरण आहे याची खातरजमा करुनच प्रवेश घेण्यात यावा. संलग्नीकरण झालेल्या महाविद्यालयाची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यांत आली आहे. संलग्नीकरण नसलेल्या महाविद्यालयात कोणत्याही परिस्थितीत प्रवेश घेवू नये त्याचप्रकारे विद्यार्थ्यांची एकाच विद्याशाखेत दोनदा नोंदणी होणार नाही याची सर्व संबंधितांनी खबरदारी घ्यावी.

टिप:— प्रवेशाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या पोर्टलवर उपलब्ध आहे.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)

उपकुलसचिव

महाविद्यालय विकास विभाग